## कल्याण वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/२०७ /२०२४ दि. २२/१०/२०२४

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

संदर्भ :– जा.क्र.निवडणुक/विधनसभा निवडणुक/कावि–१०/२४ दिनांक १८/१०/२०२४

––––०००००––––

ज्याअर्थी, कल्याण वाहतूक उपविभागाचे हद्दीत **महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ दिनांक २०/११/२०२४ रोजी होणार आह. त्या अनुषंगाने** कल्याण पश्चिम विधानसभा मतदार संघाचे मतदान प्रक्रीया मुंबई विदयापीठ उप केंद्र, वसंत व्हॅली रोड, गांधार नगर, कल्याण पश्चिम येथे पार पडणार आहे. सदर ठिकाणी उमेदवार अर्ज भरणे प्रक्रीया, निवडणूक साहित्याचे वाटप व स्वीकृती तसेच मतमोजणी प्रक्रीया पार पडणार आहे. या करीता महाराज अग्रसेन चौक कडुन वसंत व्हॅलीकडे जाणारा एकतर्फी रस्ता बंद करण्यात येणार आहे. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतुक नियंत्रण ,अधिसुचना जारी करीत आहे.

**प्रवेश बंद –** १) महाराज अग्रसेन चौक कडून डिमार्ट कडे ( वसंत व्हॅली ) जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **महाराज अग्रसेन चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने हिना गार्डन को.ऑप.हौ.सोसायटीच्या बाजुकडील जाणाऱ्या वाहीनीवरुन पुढे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. २२/१०/२०२४ ते दि. ०४/११/२०२४ रोजी दरम्यान ( दि. २६/१०/२०२४, दि.२७/१०/२०२४, दि. ०१/११/२०२४, दि.०३/११/२०२४ असे शासकीय सुट्टी वगळुन ) सकाळी १०:०० ते १८:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर .
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली/उल्हासनगर महानगरपालिका
मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

CamScanner

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली, महानगरपालिका.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग, ठाणे, कल्याण/विठ्ठलवाडी.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर.

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CS CamScanner